# उत्तररंग

**लेखक : नारायण धारप**

**समन्वय प्रकाशन, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**उत्तररंग : नारायण धारप**

**प्रकाशक**
समन्वय प्रकाशन
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. नं.: ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१३

**किंमत**
रुपये २३०/-

# मनोगत ....

माझ्या कोणत्याही पुस्तकाच्या आधी प्रस्तावना किंवा लेखकाचे दोन शब्द इत्यादी आलेले नाहीत. त्याची गरजही भासली नाही. कारण माझे सर्व लिखाण गूढकथा, भयकथा, रहस्यकथा, साहसकथा, विज्ञानकथा किंवा फँटसी या साहित्यप्रकारातच मोडते. (३०/३२ वर्षांपूर्वीच्या छाया, कांता, कृष्णा, सरिता या चार कादंबऱ्या वगळता) तेव्हा 'नारायण धारप' म्हणजे या प्रकारच्या कथा हे समीकरण वाचकांच्या मनात ठसलेलेच आहे. त्यासाठीच हे दोन शब्द आहेत. कारण ही कथा सर्वस्वी वेगळी, निखळ कौटुंबिक समस्यांबद्दल आहे.

माझ्या लेखनाबद्दल अशा अपेक्षा वाचकांनी ठेवणे योग्यच आहे. पण असे वेगळे लिखाण प्रकाशित करणाऱ्या दिलीप प्रकाशनच्या रा. दिलीप काळे यांचे मला आभार मानायलाच हवेत. यापूर्वी त्यांनी माझ्या शपथ, आनंदमहल, माटी कहे कुम्हारको, साठे/फायकस इ. भयकथा, विज्ञानकथा प्रकाशित केल्याच आहेत. पण ही वेगळ्या धाटणीची कथा प्रकाशित करणे म्हणजे जरा साहसच. तेव्हा त्यांचे पुन्हा एकदा मन:पूर्वक आभार.

आभार मानायला हवेत अशी दुसरी व्यक्ती म्हणजे माझी पत्नी सौ. प्रमिला. सुरुवाती सुरुवातीच्या ऐसी रत्ने, पारंब्याचे जग इत्यादी कादंबऱ्या सोडल्या तर गेल्या तीस वर्षांत (समर्थ कथांचा अपवाद वगळता) तिने माझी कोणतीही कथाकादंबरी वाचलेली नाही. वाचनाची आवड नाही म्हणून नव्हे, तर या प्रकारच्या कथांनी मनावर आणि झोपेवर परिणाम होतो म्हणून.

तेव्हा या कादंबरीची सुरुवात काही प्रकरणे तिने जरा भीतभीतच वाचली, पण मग मात्र या कथेतल्या पात्रांविषयी, त्यांच्या प्रतिक्रियांविषयी आमच्या खूप चर्चा

होऊ लागल्या. प्रसंगांच्या भावी पर्यायांबद्दल अनेकदा आमची चर्चा होऊन पर्याय निवडले गेले. सर्व हस्तलिखित तिने दोनदोनदा अत्यंत काळजीपूर्वक वाचले आणि तिच्या सुचनांमुळेच कथेतील काही काही उणिवा दूर झाल्या. आणि काही अगदी हास्यास्पद चुका झाल्या असत्या त्या टळल्या. तेव्हा पुन्हा एकदा तिचे कृतज्ञतापूर्वक आभार.

हे ज्येष्ठ नागरिकांचे वर्ष आहे. त्याच वर्षी ही कादंबरी प्रकाशित होत आहे हा सुयोगच.

– नारायण धारप

# एक ....

'आई रिटायर होतेय' या नाटकाची परीक्षणं, चर्चा, सर्व काही विमलने वाचलं होतं. नाटक पाहून आलेल्या मैत्रिणींनीही आपापली मतं सुनावली होती. सासूची आणि आईची, दोन्ही भूमिका तिने आयुष्यात वठवल्या होत्या. अर्थात स्त्री मुलाची आई किंवा सुनेची सासू, किंवा मुलीची आई आणि जावयाची सासू असतेच. तेव्हा विमलच्या मनात थोडीशी उत्सुकता जन्माला आली होतीच. शेवटी त्या शनिवारच्या संध्याकाळच्या खेळाचं तिकीट तिने रिझर्व्ह केलंच.

मागाहून तिने यावर मनाशी हजारदा तरी विचार केला असेल – समजा, आपण त्या शोला गेलो नसतो तर ? तर हे काहीच घडलं नसतं...

तसा नाटकाला येणारा स्त्रीवर्ग जरा पॉश असतोच. तेव्हा विमलनेही कपड्यांची निवड जरा विचारपूर्वक केली होती. फिकट अंजिरी रंगाची रेशमी साडी आणि त्याचाच ब्लाऊझ. गळ्यात लहान मोत्यांचा दोन पदरांचा सर, मनगटावर प्लॅटिनम केसचं वॉच. बस. बाकी काही नाही. पण मी मोठ्या आरशासमोर उभी राहिली तेव्हा प्रतिबिंब पाहून तिला समाधान वाटलं. आरशासमोर उभं राहिलं की वयाची मोजदाद मनात आपोआपच व्हायची. एवढ्याएवढ्यातच तिला बावन्नावं वर्ष लागलं होतं. वयापेक्षा आपण पाचसात वर्षांनी लहानच दिसतो, एवढाच तिने मनाशी विचार केला. प्रत्यक्षात तिच्या तारुण्यातील सौंदर्याच्या कितीतरी खुणा अजून दिसत होत्या. केस मागे गेले नव्हते. कानांपाशी जराशी चंदेरी छटा आली होती इतकंच. बारीक मजकूर वाचायची वेळ सोडल्यास चष्मा लागत नसे. पाठीला बाक आला नव्हता. वजन जेवढ्यास तेवढं होतं. कोठेही ढिलाई आली नव्हती. पण ही तर केवळ शारिरीक बाजू झाली. बुद्धी तरतरीत होती. नव्याचं कौतुक होतं. स्वाभिमान होता. जिद्द होती. पण दुसऱ्यांच्या भावनांची कदर करण्याचा समंजसपणाही होता.

अपेक्षेपेक्षा ती थिएटरवर बरीच लवकर पोचली. पोर्चमध्ये कोणी ओळखीचं दिसतं का ते तिने पाहिलं – मग ती आत गेली. अजून दिवे मंदावलेले नव्हते, आणि आपल्यावर बऱ्याच नजरा खिळलेल्या आहेत याची तिला जाणीव झाली – पण ती गोष्टी सरावाने सवयीची झाली होती.

सातव्या रांगेतली सुरुवातीपासूनची दुसरी सीट तिची होती. पुढच्या सर्व भरलेल्या दिसत होत्या – फक्त पहिली रिकामी होती. तिला स्वत:ला नेहमी कडेची जागा आवडत असे. आताही तिने एक जरासा धाडसी निर्णय घेतला आणि ती त्या पहिल्या खुर्चीतच बसली. त्या जागेचे आरक्षण असणाऱ्या व्यक्तीस शेजारची खुर्ची घेण्याची विनंती करता येईल, ऐकलं तर बरंच – तिने मनाशी विचार केला. पण जागेवर ती जराशी स्थिरस्थावर होते ना होते तोच एक बरेच उंच, जरासे वयस्क गृहस्थ रांगेपाशी उभे राहून हातातील तिकिटाकडे पाहू लागले. एकदा नंबराकडे, मग विमलकडे, पुन्हा एकदा तिकिटाकडे अशी त्यांची नजर फिरत होती. उघड होतं की विमल त्यांच्या सीटवर बसली होती आणि तिला तसं सांगणं त्यांना जरा अवघड वाटत होतं. शेवटी विमलच जरा हसत म्हणाली, ''तुमची ही सीट आहे ना ? मग जर आपली काही गैरसोय होत नसेल तर मी इथे बसू का ? शेजारची सीट माझी आहे. आपली काही हरकत नसली तर –'' तिने वाक्य अर्धवटच सोडलं.

''अरे ! हरकत कसली ! किती साधी गोष्ट ! अगदी अवश्य बसा, अगदी आरामात बसा !'' ते हसत म्हणाले, आणि तिला ओलांडत शेजारच्या सीटवर बसले. आवाज खडा, लक्षात राहण्यासारखा होता. हालचालीही आटोपशीर होत्या. खुर्चीत बसता बसता त्यांनी सर्व थिएटरभर नजर फिरवली होती.

''जवळ जवळ हाऊसफुल्ल आहे , नाही का ? – दोनशेच्यावर प्रयोग तरी झालेच असतील –'' आणि विमल काही बोलायच्या आतच पुढे म्हणाले – ''आणि शिवाय गुजराथी, हिंदी इतरही भाषांतून नाटकाचं भाषांतर झाल्याचं वाचलं आहे–''

अर्थात काहीतरी प्रतिसाद आवश्यकच होता.

''मी काही नाटक पाहिलेलं नाही–'' विमल म्हणाली. ''पण तुम्ही म्हणता ते खरं आहे – काहीतरी खास आकर्षण असलंच पाहिजे – परीक्षण वाचता वाचता कथानकाची साधारण कल्पना येते – पण शेवटी शब्द आणि दृश्य – फरक असणारच!''

ते काहीतरी बोलणार होते – पण तेवढ्यात दिवे मंदावले – संगीताचे स्वर

यायला लागले – मग ध्वनिक्षेपकावरून स्वागत इत्यादी –

अंक संपून प्रेक्षागारात दिवे लागले. विमलची अगदी खात्री होती की शेजारच्या गृहस्थांकडून काहीतरी टीकाटिप्पणी येणारच. त्या अपेक्षेनेच ती त्यांच्याकडे वळली. स्वत:शी मान हलवत ते म्हणाले, ''तुम्ही आई असणारच, कदाचित सासूही असाल – करेक्ट ?''

''करेक्ट'' ती किंचित हसत म्हणाली.

''स्टेजवरच्या आईने जे केलं ते तुम्ही कराल ?

''बूटपॉलीश ? अर्थात नाही !'' तिचं हास्य आणखी उघड झालं होतं.

''मी त्या वडिलांच्या ठिकाणी असतो तर त्या आईवर रागावलोच असतो – कमीपणा किंवा... किंवा... जाऊद्या ! किती घ्यायचा स्वत:कडे ?''

''तरीही नाटक हाऊसफुल्ल चाललं आहे !'' ती हसत म्हणाली.

त्यांच्या चेहऱ्यावरच्या नाराजीच्या रेषा जाऊन तिथे हास्य आलं.

''अगदी बरोबर. हे काय गर्दीचं मानसशास्त्र आहे कळतच नाही. मागे काही बारापंधरा वर्षांपूर्वी – आपल्या गाडगीळांनी वसंत कानेटकरांच्या 'अश्रूंची झाली फुले' या नाटकावर एका दिवाळी अंकात एक लंबाचवडा लेख लिहिला होता. तुमच्या वाचनात आला ?''

तिने केवळ मानेनेच नाही म्हटलं.

''त्या सर्व नाटकाचं एक पोस्टमार्टेमच केलं होतं. कितीतरी विसंगती दाखवल्या होत्या. पण नाटकाची लोकप्रियता कणानेही कमी झाली नाही – हजाराच्यावर प्रयोग झाले – अजूनही तारीख लागली की हाऊसफुल ! गम्मत म्हणजे मीही नाटक पाहिलं होतं – पणशीकरांच्याबरोबर तेव्हा घाणेकर होते – आणि त्यांच्या अभिनयाच्या जुगलबंदीत बारीकसारीक तपशिलाकडे लक्षच गेलं नाही ! लेख वाचताना पावलोपावली वाटायचं – अरे हो ! खरंच की ! –''

त्यांनी एकदम तोडावर हात ठेवला.

''सॉरी हं. मला माफ करा. विसरूनच गेलो की आपली ओळख नाही. सुरुवातीपासून बोअर करून राहिलोय तुम्हाला. तुम्हीच आपल्या सुस्वभावी म्हणून ऐकून घेताहात – आय ॲम रिअली सॉरी !''

हसू दडवण्यासाठी विमलला चेहऱ्यावर हात ठेवावा लागला. मान हलवत ती म्हणाली, ''अजिबात नाही ! अजिबात नाही !''

हुश्श ! करीत ते म्हणाले, ''थँक गॉड !''

पुन्हा एकदा दिवे मंदावत होते.

नाटकातला एक एक प्रसंग पाहताना ती स्वत:च्या आयुष्याचीही उजळणी करीत होती. वसंताच्या – तिच्या मुलाच्या – पत्नीचं बाळंतपण तिच्या माहेरी झालं होतं – पण नातू तीन महिन्यांचा झाल्यावर (वसंता वेगळ्या जागी राहायला जाईपर्यंत) तिलाच नातवाची देखभाल करावी लागत होती. घरची कर्ती म्हणून आणि अनुभवी म्हणून. वासंतीचं – तिच्या मुलीचं – बाळंतपण तर तिच्याकडेच झालं होतं. तेव्हा नाटकातल्या आईच्या घालमेलीची तिला पूर्ण कल्पना येत होती. कदाचित ती स्वत: वेगळी वागली असती – पण हा स्वभावास्वभावातला फरक झाला – तेवढा असणारच.

दुसरा अंक संपला – दिवे लागले.

शेजारचे गृसस्थ उभे राहिले होते. तिची मान वर होताच ते म्हणाले,

''येता एखादी कॉफी घ्यायला ?''

ती क्षणभर घुटमळली.

''चला हो ! नुसतं बसून काय करणार आहात ? प्लीज ?''

''ठीक आहे. चला.'' पर्स सावरत ती उठली.

कॉफी यथातथाच होती. पाय मोकळे करायला, उघड्यावर यायला एक निमित्त. पहिली घंटा होताच दोघे परत आले – आपापल्या जागांवर बसले. बसल्या बसल्या त्यांनी विचारलं –

''कथानक कोठे चाललं आहे काही कल्पना येते ?''

''ते नाटकाच्या नावातच आहे, नाही का ?''

''खरं सांगू का ? माझी जराशी निराशाच झाली आहे – ''

पर्स मांडीवर घेत विमल म्हणाली, ''पती–पत्नी, आई–मुलगा आणि सासू–सून या त्रिकोणातले प्रश्न खरोखर घरोघरीच उभे राहात आहेत. मला वाटतं ज्याला जसं जमेल तसं तो त्या समस्यांना उत्तर द्यायचा प्रयत्न करीत असतो.''

''खरं आहे तुम्ही म्हणता ते –'' त्यांना आणखी काही बोलायचं असलं तर ते राहूनच गेलं – कारण दिवे मंदावत होते.

नाटक संपताच अगदी साहजिकपणे दोघं बरोबरच बाहेर आले. दारापाशी जरा थांबावं लागलं तेव्हा ते गृहस्थ म्हणाले, ''आज तुमची चांगली कंपनी मिळाली. नाहीतर लोक आपापल्यातच इतके मशगूल असतात, ओठ इतके घट्ट मिटून घेतलेले असतात की बोलायचीच सोय नसते – अगदी शब्दश:''

बाहेर यायला वाट मिळाली. पण पोर्चमधली गर्दी विरळ होत नव्हती.

आणि त्याला कारणही होतं.

कोणाच्याही ध्यानीमनी नसताना मुसळधार पाऊस सुरू झाला होता. विमल आणि ते गृहस्थ त्या पोर्चमधल्या घोळक्यात उभे राहिले.

''तुमची गाडी आहे ?'' त्या गृहस्थांनी विचारलं.

विमलने नुसतीच मान हलवली नाही.

''मग इथे थांबा. माझी गाडी घेऊन येतो. तुम्हाला लिफ्ट देतो.''

''छे छे ! अहो, मी रिक्षाने जाईन की !''

''एवढी झुंबड उडालेली आहे ! जो तो रिक्षासाठीच धावपळ करणार – तुम्ही कोठे जाणार आहात पावसापाण्यात वाहन शोधायला ? किती वेळ लागेल, एवढं थांबून मिळेल का नाही – कशाची खात्री आहे ? थांबा – मी गाडी आणतो.''

ती काही बोलायच्या आधीच ते झपाझप गेलेसुद्धा. निर्णय तिच्या हाती राहिलाच नव्हता. पाच–दहा मिनिटातच पोर्चमध्ये लाल मारुती आली. गर्दीतून गाडीकडे जाताना अनेकांच्या नजरा आपल्यावर खिळल्याची तिला जाणीव झाली. गाडीपाशी पोचेपर्यंत त्यांनी पुढचं दार उघडलं होतं. आणि अर्थात (मनात किंचित शंका असूनही) तिला फ्रंटसीटवर बसावंच लागलं.

प्रवास आरामाचा होता, सोईचा होता, तिने त्यासाठी कोणताही प्रयत्न केला नव्हता – हे सर्व खरं असूनही तिला जरासं अपराधी वाटत होतं.

रस्त्याला लागताच तिने त्यांना आपला पत्ता सांगितला.

शेवटी न राहवून ती म्हणाली, ''तुम्ही माझ्या डोक्यावर उपकारांचा केवढा तरी बोजा रचला आहे !''

''अहो, खूप वेळा मदत करण्याची इच्छा असते – काही वेळा संधी मिळत नाही – काही वेळा गैरसमज होण्याची भीती असते –''

त्यांच्या शेवटच्या वाक्याने ती जरा चपापली.

''माझा हेतू तो नव्हता – एखाद्याला किती तोशीस द्यायची –''

ती गप्प बसली. तेही गाडी चालवण्यात मग्न झाले.

पावसाचा जोर विलक्षण होता. रस्त्यावर काही तुरळक वाहनांखेरीज वाहतूक अजिबात नव्हती. निर्जन, वाहत्या पाण्याचे रस्ते.

बघता बघता तिचं डुप्लेक्स अपार्टमेंट आलं. डावीकडची बाजू तिची होती. गाडी पोर्चमध्ये येऊन थांबली. आता मात्र तिच्यासमोर एक खरीखुरी समस्या उभी

राहिली. एवढी या गृहस्थांनी मदत केली – त्यांना एखादी चहाकॉफीची तरी ऑफर करायला हवी का नको ? पण ती एकटी आणि अशा रात्रीच्या वेळी – मग तिला त्यांचं वाक्य आठवलं – ''काही वेळा गैरसमज होण्याची भीती असते.''

तिच्या मनाचा क्षणभर विलक्षण गोंधळ झाला.

आपण काय करतो आहोत इकडे तिचं लक्षच नव्हतं.

नाहीतर तो अपघात झालाच नसता.

गाडीचं दार उघडून तिने एक पाऊल बाहेर घेतलं होतं. दुसरं बाहेर घेतानाच पर्स मधे आली. पर्स सावरायला तिने दारावरचा हात काढून घेतला. साडीची किनार सँडलमध्ये अडकली. जरासा तोल गेला. आधारासाठी तिने हात दाराकडे नेला – पण धक्का बसून दार उघडलं आणि तिचा तोल जाऊन ती वेडीवाकडी गाडीबाहेर कोसळली.

उजव्या पायाच्या घोट्यातून जीवघेणी कळ आली.

पडता पडता ती काहीतरी ओरडली असली पाहिजे.

''अरे ! अरे काय झालं ?'' म्हणत ते गृहस्थ घाईने गाडीचं दार उघडून बाहेर आले, पुढच्या भागाला वळसा घालून विमलपाशी पोचले. विमल जशी खाली कोसळली होती तशीच एका हाताचा आधार घेऊन डोळे मिटून नुसती बसली होती.

''अशाच थांबा हं – मी घंटी वाजवून कोणाला तरी आणतो –''

''नाही – नाही –'' विमल धापा टाकत म्हणाली. ''घरात कोणीही नाही. मी एकटीच असते – पर्समध्ये – पर्समध्ये घराची किल्ली आहे – माझा उजवा पाय – उजवा घोटा – आई गं !''

ते चटदिशी खाली बसले. तिचा उजवा पाय समोरच होता. एव्हानाच पायावर सूज यायला लागली होती. त्यांनी पायातल्या सँडल आधी काढून टाकल्या. तिच्या जवळची पर्स उचलली.

''लॅच आहे का दाराला ?'' त्यांनी विचारलं.

तिने मानेनेच 'हो' ची खूण केली.

''हलायची खटपट करू नका –'' ते म्हणाले. ''मी येतोच एवढ्यात –'' त्यांनी गाडीची दोन्ही दारं बंद केली. पायऱ्या चढून मोठ्या दाराचं कुलूप उघडलं. त्यांच्या खिशात पॉकेट टॉर्च असला पाहिजे. त्याच्या प्रकाशाचं लहानसं वर्तुळ दारावर फिरत होतं – ते शेवटी लॅचच्या पितळी तबकडीवर स्थिर झालं. लॅच